लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

कंट्रक्शन
आमच्याकडे कमर्शियल रेसिडेंशियल बंगलोज अपार्टमेंट दर १६५० चौ. फुटप्रमाणे मटेरियलसह लॉक अँड की प्रोजेक्ट करून दिले जातील. संकल्प इंजीनियर्स
मो. ९३७१५२३९३९

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ४७ वा | गुरुवार, दि. ०५ सप्टेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

## कांद्याला प्रतिक्विंटल 5000 भाव! कोथिंबीरीचा दर तेजीत, निर्यातबंदी नको, शेतकऱ्यांची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याला प्रतिक्विंटल पाच हजार रूपयांचा उच्चांकी दर (मंगळवारी) मिळाला आहे. कांद्याचा सरासरी भाव तीन हजार ७०० रुपयांपर्यंत होता. बाजार समितीत मंगळवारी ५९ गाड्या कांद्याची आवक होती.





सोलापूर जिल्ह्यात यंदा समाधानकारक पाऊस झाल्याने कांदा लागणीला वेग आला आहे. गतवर्षी दुष्काळी स्थिती असताना देखील जिल्ह्यात कांद्याचे उत्पादन चांगले होते, पण केंद्र सरकारच्या निर्यातबंदीचा फटका शेतकऱ्यांना सोसावा लागला. बाजार समितीत पाच, सहा हजार रुपये क्विंटल दर असलेला कांदा निर्यातबंदीनंतर लगेचच निम्म्यावर आला होता. शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर कांदा बंगळुर बाजार समितीत विकला. पण, मागील दोन महिन्यांपासून कांद्याला सोलापूर बाजार समितीत कांद्याला तीन हजार रुपयांवर दर मिळत आहे.

मंगळवारी सोलापूर बाजार समितीत कांद्याला प्रतिकिलो ५० रुपयांचा दर मिळाला.

कांद्याची आवक कमी झाल्याने दर आणखी वाढेल, असे बाजार समितीतील अधिकाऱ्यांनी सांगितले. सध्या बाजार समितीत येणारा कांदा स्थानिक असून नोव्हेंबनंतर नवीन लागवड केलेला कांदा बाजार समिती येईल, असेही सांगण्यात आले. तर ऑक्टोबरपासून कर्नाटकचा कांदा काढणी सुरू होते. यंदा भाव तीन हजारांपर्यंत राहील, असा अंदाज आहे.

**बाजार समितीत कोथिंबीर ३० रुपये पेंडी**

मुसळधार व सततच्या पावसामुळे लागवड केलेली कोथिंबीर खराब झाली आहे. त्यामुळे बाजार समितीत कोथिंबीरची आवक कमी झाली आहे. या पार्श्वभूमीवर सणासुदीमुळे कोथिंबीर किरकोळ बाजारात ५० ते ६० रुपये पेंडी अशी विकली जात आहे. तर सोलापूर बाजार समितीत मंगळवारी कोथिंबीरीच्या एक पेंडीला ३० रुपयांचा दर मिळाला. आता कोथिंबीरीचा दर आणखी काही दिवस तेजीत राहील, अशी स्थिती आहे.

## पावसाचा जोर वाढल्याने खरीप पिकांना फटका

गेल्या काही दिवसाच्या विश्रांतीनंतर सोलापूर जिल्ह्यात पावसाने पुन्हा जोरदार सुरवात केली असून, सोमवारी (ता. २) सलग तिसऱ्या दिवशी पहाटेपासून दिवसभर थांबून-थांबून पावसाच्या सरी कोसळत राहिल्या. अक्कलकोट, बार्शी, पंढरपूर, मोहोळ, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर तालुक्यात पावसाचा जोर सर्वाधिक राहिला.

सोलापूर जिल्ह्यात गेल्या आठवड्यात पावसाने विश्रांती घेतली होती. उन्हाचा कडाका वाढल्याने उष्मा जाणवत होता. पण शनिवारी (ता.३१) सायंकाळी पावसाने हलकी हजेरी लावली. त्यानंतर रविवारी (ता.१) पहाटेपासून पावसाची पुन्हा सुरवात झाली. रविवारी दिवसभर पावसाची संततधार सुरुच होती.



त्यामुळे ग्रामीण भागातील सर्व शेतीकामे खोळंबली. दिवसभर सूर्यदर्शन झाले नाही. त्यानंतर आज सोमवारी (ता.२) पाऊस विश्रांती घेईल, असे वाटत असतानाच सोमवारीही पहाटेपासून पुन्हा त्याने तोंड वर काढले.

सकाळी सात ते नऊच्या दरम्यान अनेक भागात जोरदार पाऊस झाला. जिल्ह्यातील पंढरपूर, अक्कलकोट, बार्शी, माळशिरस, सांगोला, करमाळा अशा भागात पावसाने सर्वदूर हजेरी लावली. तसेच दिवसभर थांबून-थांबून त्याची रिपरिप सुरुच राहिली.

## तोडगा निघाला, एसटी कर्मचाऱ्यांच्या मूळ पगारात 6500 रुपयांची वाढ, संप मागे

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** एसटी कर्मचाऱ्यांनी अखेर संप मागे घेतला आहे. एसटी कर्मचाऱ्यांची आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत बैठक पार पडली. या बैठकीत एसटी कर्मचाऱ्यांच्या काही मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत.

विशेष म्हणजे शासनाने एसटी कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात साडे सहा हजारांची वाढ केली आहे. एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या संपावर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आज महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला एसटी कामगार संयुक्त कृती समितीचं शिष्टमंडळ उपस्थित होतं. तसेच भाजप आमदार गोपीचंद पडळकर, आमदार सदाभाऊ खोत, वकील गुणरत्न सदावर्ते, एसटी कष्टकरी जनसंघच्या जयश्री पाटील या देखील बैठकीला उपस्थित होत्या. मुख्यमंत्री एसटी कर्मचाऱ्यांची मनधरणी करण्यात यशस्वी होणार का? याकडे राज्याचं लक्ष होतं. अखेर एकनाथ शिंदे यांना याबाबत मोठं यश आलं आहे. एसटी कर्मचाऱ्यांनी 5000 रुपयांची वेतनात वाढ करण्याची मागणी केली होती. पण सरकारने तब्बल 6500 रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी बैठकीनंतर माध्यमांना प्रतिक्रिया दिली. 'मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री उदय सामंत यांचा मी मनापासून आभार मानतो. आमची मागणी होती की, राज्य सरकारमधील कर्मचाऱ्यांच्या वेतननुसार महाराष्ट्रातील एसटी कर्मचाऱ्यांना वेतम मिळावं. किमान त्यांच्या लेव्हलला घेऊन जायला पाहिजे. सरकाने त्यासाठी जी समिती नेमली होती त्या समितीने साडेपाच हजारांची मागणी सरसकट करावी, अशी सूचना केली होती. आमची मागणी पाच हजार रुपये वेतन वाढवण्याची मागणी केली होती. सरकारने आमची मागणी मान्य केली आहे. ज्या कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर 2021 मध्ये अडीच हजार, चार हजार आणि पाच हजार अशी सरसकट वाढ केली होती. त्या कर्मचाऱ्यांना सरसकट साडेसहा हजार रुपयांची वेतनात वाढ केली आहे', अशी माहिती गोपीचंद पडळकर यांनी दिली.



**नेमकी पगारवाढ कशी झाली?**

'ज्यांना 5 हजार रुपयांची वाढ 2021 झाली होती, त्यांच्या पगारात आता दीड हजार रुपयांची वाढ झाली आहे. तसेच 2021 ला ज्यांना चार हजार रुपयांची वाढ दिली होती त्यांच्या पगारात अडीच हजारांची वाढ झाली. ज्यांना अडीच हजारांची वाढ दिली होती त्यांच्या पगारात 4 हजार रुपयांची भरघोस वाढ सरकारने केली आहे. मी या निमित्त राज्य सरकारचा महाराष्ट्रातील कर्मचाऱ्यांच्या वतीने आभार व्यक्त करतो', अशी प्रतिक्रिया गोपीचंद पडळकर यांनी दिली. तसेच पडळकर यांनी सर्व एसटी कर्मचाऱ्यांना उद्या सकाळी सात वाजेपासून कामावर जाण्याचं आवाहन केलं.

(पान 2 वर..)

## सोलापूर लोकसभा मतदारसंघातील सहा ही विधानसभा मतदारसंघ काँग्रेस कडे घ्यावेत खा प्रणिती शिंदे यांची मागणी

### पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर, पुणे, सातारा, कोल्हापूर जिल्ह्याची आढावा बैठक पुण्यात संपन्न

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर, पुणे शहर व ग्रामीण, सातारा, व कोल्हापूर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक पुण्यात झाली.



याबैठकित खासदार प्रणिती शिंदे यांनी महाविकास आघाडीच्या जागावाटपात सोलापूर लोकसभा मतदारसंघातील सोलापूर शहर मध्य, शहर उत्तर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ, पंढरपूर मंगळवेढा ही सहा ही विधानसभा मतदारसंघ काँग्रेस कडे घ्यावी तेथे निश्चितच काँग्रेसचे उमेदवार निवडून येतील असा विश्वास यावेळी व्यक्त केला.

तसेच यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष नंदकुमार पवार यांनी बूथ कमिटी, मतदान नोंदणी, बैठका, पक्षाचे कार्यक्रम आंदोलन या विषयी माहिती दिली.

या बैठकीला प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, विधान परिषदेतील गटनेते सतेज पाटील, उहउ सदस्य, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, गोवा दिव दमनचे प्रभारी माणिकराव ठाकरे, खासदार प्रणिती शिंदे, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, माजी मंत्री रमेश बागवे, मोहन जोशी, अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष वजाहत मिर्झा, पुणे ग्रामीण जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आ. संजय जगताप, पुणे शहर काँग्रेसचे अध्यक्ष अरविंद शिंदे, पिंपरी चिंचवड काँग्रेसचे अध्यक्ष कैलाश कदम, आ. संग्राम थोपटे, आ. रविंद्र धंगेकर एनएसयुआयचे प्रदेशाध्यक्ष आमिर शेख आदि उपस्थित होते.

यावेळी चेन्नीथला यांनी बोलताना आतापर्यंत १२० मतदारसंघातील आढावा घेण्याचे काम पूर्ण झाले आहे. संघटन मजबूत करण्याचा हा कार्यक्रम असून जनतेमध्ये जाऊन काँग्रेसचा विचार पोहचवणे तसेच केंद्र व राज्य सरकारच्या जनविरोधी धोरणांची माहिती पोहचवण्याचे काम केले जाणार आहे. लोकसभा निवडणुकीत जनतेने मविआला जसा पाठिंबा दिला तसाच विधानसभा निवडणुकीतही देतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

या बैठकीस सोलापूर शहर जिल्ह्यातून जिल्हा कार्याध्यक्ष नंदकुमार

(पान 2 वर..)

## शिक्षकांसह २२ हजार कर्मचाऱ्यांना इलेक्शन ड्युटी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील तीन हजार ७२३ मतदान केंद्रांसाठी लागणाऱ्या सर्वच 'ईव्हीएम'ची प्रथमस्तरीय तपासणी पूर्ण झाली आहे.

पाच हजार 'ईव्हीएम' आता गोडावूनमध्ये सिलबंद करून ठेवण्यात आल्या आहेत. आता प्रशिक्षणाचा पुढील टप्पा सुरू झाला असून जिल्ह्यातील ४४ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे १५ सप्टेंबरपर्यंत प्रशिक्षण सुरू झाले आहे.

राज्यात राष्ट्रपती राजवट लागणार नाही, यादृष्टीने २६ नोव्हेंबरपूर्वी सरकार स्थापन होणे जरूरी आहे. त्यामुळे ऑक्टोबरमध्ये आचारसंहिता जाहीर होऊन दिवाळीनंतर (३ नोव्हेंबरनंतर) मतदान शक्य आहे. पण, निवडणूक आयोगाकडून अद्याप राज्यातील विधानसभेच्या कार्यक्रमाची प्रतीक्षाच आहे.

तत्पूर्वी, मतदान यादी अंतिम करण्यात आली आहे. याशिवाय 'ईव्हीएम'ची प्रथमस्तरीय तपासणी देखील पूर्ण करण्यात आली आहे. आता निवडणूक निर्णय अधिकारी (उपजिल्हाधिकारी तथा प्रांताधिकारी, तहसीलदार) यांचे पुण्यात प्रशिक्षण सुरू आहे. १ ते १५ सप्टेंबर या काळात त्यांचे प्रशिक्षण पूर्ण होईल. त्यानंतर विधानसभा निवडणुकीसाठी लागणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी अंतिम करून त्यांचेही प्रशिक्षण होणार आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी सोलापूर जिल्ह्यात यंदा तीन हजार ७२३ मतदान केंद्रे आहेत. त्यात शहरी भागात एक हजार १७७ तर ग्रामीण भागात दोन हजार ५४६ केंद्रे आहेत. त्या केंद्रांवर निवडणुकीवेळी काम करण्यासाठी जिल्ह्यातील २२ हजार कर्मचाऱ्यांना इलेक्शन ड्युटी असणार आहे. त्यात प्रामुख्याने शिक्षण विभागाकडील प्राथमिक, माध्यमिक शाळांमधील शिक्षक, महसूल, जिल्हा परिषदेसह अन्य शासकीय विभागांकडील कर्मचारी देखील असणार आहेत. त्यांची माहिती सध्या संकलित करून ऑनलाइन भरली जात आहे. निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यावर त्यांचे प्रशिक्षण सुरू होणार आहे.

## शिवरायांचा पुतळा दुर्घटना प्रकरणी शिल्पकार जयदीप आपटेला अटक

मालवणच्या राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना घडली होती. या प्रकणातील मुख्य आरोपी शिल्पकार जयदीप आपटे हा फरार होता.अखेर आज त्याला अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. कल्याणमध्ये आपल्या कुटुंबियाला भेटायला आला असताना कल्याण पोलिसांनी त्याला अटक केली.



शिवरायांचा पुतळा बनवणारा शिल्पकार जयदीप आपटे याला कल्याण पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. जयदीप आपटे अंधाराचा फायदा घेत पोलिसांची नजर चुकवत आपल्या पत्नी आणि आईला भेटण्यासाठी त्याच्या कल्याणच्या राहत्या घरी आला होता. पण पोलिसांनी जयदीप आपटे याला ताब्यात घेतले आहे. जयदीप आपटे याच्या विरोधात पोलिसांनी लुकआऊट जारी केली होती. आपटे पुतळा कोसळल्यापासून फरार होता. अखेर त्याला शोधून काढण्यात पोलिसांना यश आलं आहे.

दरम्यान आता जयदीप आपटेच्या अटकेवरून आता राजकारण सूरू झाले आहे. काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी जयदीप आपटेला त्याच्या घरातून अटक केली. याचा अर्थ तो स्वतः समोर आला, पोलिसांना सापडला नाही. हा निष्कर्ष निघू शकतो. असो !त्याला असलेल्या वरदहस्तामुळे तो सापडायला इतका वेळ लागला का? हा प्रश्न आहेच, असा सवाल केला आहे.

**प्रकरण काय?**

गेल्या वर्षी 4 डिसेंबर 2023 ला नौदल दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मालवणमधील राजकोट किल्यावर येऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या या पुतळ्याचे अनावरण केले होते. या अनावरणाला आता नऊ महिने उलटले आहेत. पण अवघ्या ९ महिन्यात शिवाजी महाराजांचा हा पुतळा कोसळल्याची घटना घडली आहे. त्यामुळे पुतळ्याच्या कामकाजाच्या निकृष्टतेवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. यावरून आता स्थानिक आमदार वैभव नाईक यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे.गेल्या सहा महिन्यापूर्वी मोदींच्या दौऱ्यावेळी हा पुतळा घाईगडबडीत बसवला होता. त्यावेळी स्थानिकांनी या पुतळ्याच्या निकृष्ट बांधकामावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. मात्र ते विरोधक आहेत म्हणून त्यांच्या मुद्याकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. आणि आज पंतप्रधान मोदींनी अनावरण केलेला पुतळा पडला. त्यामुळे सरकारच्या कामाचे आज वाभाडे निघाले आहेत, असे उबीटीचे आमदार वैभव नाईक यांनी म्हटले आहे. या प्रकरणी एफआयर दाखल झाली पाहिजे, जर प्रशासनाने आणि जिल्हा प्रशासनाने एफआयआर दाखल केला नाहीतर शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा वैभव नाईक यांनी दिला.

## पीक नुकसानाची माहिती ७२ तासांत विमा कंपनीस कळवा

**सोलापूर :** जिल्ह्यात २८ ऑगस्ट २ सप्टेंबर २०२४ या कालावधीत मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू असून, अजून पुढील काही दिवस पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. पावसामुळे विमा संरक्षित क्षेत्र जलमय होऊन पिकांचे नुकसान झालेले असल्यास विमा संरक्षित क्षेत्राला नुकसान भरपाई मिळण्यासाठी झालेल्या नुकसानीची पूर्वसूचना संबंधित विमा कंपनीस ७२ तासांमध्ये कळवावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रेय गावसाने यांनी केले आहे.

जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप २०२४ या हंगामाकरिता अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी राबविण्यात येत आहे. जिल्ह्यासाठी खरीप २०२४ मध्ये ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड या विमा कंपनीची नियुक्ती करण्यात आलेली आहे.



पीक विमा योजनेतर्गत खरीप २०२४ मध्ये जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत शेती क्षेत्राचे नुकसान झाल्यास विमा कंपनीकडे नुकसान भरपाई दावा दाखल करता येतो. विमा दावा मंजूर होण्यासाठी झालेल्या पीक नुकसानीची माहिती, पूर्वसूचना कंपनीस देणे गरजेचे आहे. नुकसानीबाबतच सूचना पीक विमा कंपनीकडे नोंद करण्यासाठी पीक विमा ॲप अथवा कृषी रक्षक पोर्टल टोल फ्री क्रमांक १४४७ या क्रमांकाचा वापर करावा.



## संपादकीय

# शेतकर्‍यांचे उत्पन्न

देशातील शेतकर्‍यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर आणि व्यवस्थापनावर भर देर्णाया सात महत्त्वपूर्ण योजनांना केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या सर्व योजनांवर 14 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी खर्च केला जाणार आहे.सरकारने ज्या सात योजना जाहीर केल्या त्या कागदावर जरी व्यवस्थित दिसत असल्या तरी त्याची अंमलबजावणी कशाप्रकारे होणार आहे, हा मात्र संशयाचा मुद्दा असू शकतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी 2014 मध्ये जेव्हा पहिल्यांदा पंतप्रधान झाले तेव्हा त्यांनी आपल्या पहिल्याच भाषणामध्ये 2022 पर्यंत देशातील शेतकर्‍याचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा केली होती. आता 2024 मध्ये तिसर्‍यांदा पंतप्रधानपदावर विराजमान झालेल्या नरेंद्र मोदी यांनी देशातील बळीराजाचे उत्पन्न खरोखरच दुप्पट झाले आहे की नाही याचा शोध घेण्याची गरज आहे. गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये पंजाब, हरियाणा आणि दिल्लीसह देशाच्या विविध राज्यांमध्ये ज्या प्रकारे शेतकरी आंदोलने होत आहेत ती पाहता देशातील बळीराजा समाधानी नाही आणि त्याच्या उत्पन्नामध्येही समाधानकारक वाढ झालेली नाही हेच समोर येताना दिसत आहे. साहजिकच केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या या निर्णयांचाही समावेश यापूर्वी घेण्यात आलेल्या शेतकरीविषयक निर्णयांच्या यादीमध्ये झाला, तर त्याचा काहीच उपयोग होणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्तेवर आल्यापासून 'डिजिटल इंडिया'चा नारा दिला आहे आणि आता या नव्या निर्णयांमध्येसुद्धा शेतकर्‍यांसाठी डिजिटल माध्यमाचा वापर करण्यावर जास्त भर असणार आहे. पण गेल्या अनेक वर्षांपासून देशातील बळीराजाचा जो मूलभूत प्रश्न आहे तो म्हणजे त्याच्या शेतीमालाला योग्य किंमत मिळणे.त्याबाबत जर योग्य विचार झाला तरच शेतकर्‍याचे उत्पन्न दुप्पट करण्याचे स्वप्न साकार होऊ शकते. याचा विचार सर्व सत्तार्धायांना करावा लागणार आहे. वर्षभर मेहनत करून शेतकरी आपल्या शेतामध्ये जरी पिके पिकवत असला तरी ती अनेक वेळा एजंटांच्या आणि मध्यस्थाच्या घशात जातात आणि हे एजंट आपली तिजोरी गरम करतात आणि शेतकर्‍यांच्या खिशात मात्र किरकोळ पैसे पडतात. ही प्रक्रिया वषार्नुवर्षे सुरू आहे. देशात सर्वच तालुका पातळीवर जरी कृषी उत्पन्न बाजार समित्या स्थापन झाल्या असल्या, तरी या बाजार समित्यांनासुद्धा राजकारणाचे वलय असल्यामुळे त्याचा फटका या बाजार समितीच्या कार्यपद्धतीला अनेक वेळा बसताना दिसतो. बाजार समितीच्या माध्यमातून जरी शेतकर्‍यांनी शेतमाल विक्रीसाठी उपलब्ध करून दिला तरी त्याला योग्य तो भाव मिळतोच अशी कोणतीही खात्री देता येत नाही. जगातील सर्वात प्रमुख साखर उत्पादक देश असलेल्या भारतामध्ये दरवर्षीच उसाला एफआरपी देण्यासाठी शेतकर्‍यांना आंदोलन करावी लागत आहेत, याचा अर्थ काय घ्यायचा. साखरेसारख्या महत्त्वाच्या नगदी पिकाला दरवर्षी योग्य दर मिळण्यासाठी जर आंदोलन करावे लागत असेल, तर नियोजन पातळीवरच काहीतरी, कुठेतरी चुकते आहे हे आता मान्य करावे लागणार आहे.कांदा आणि टोमॅटो या पिकांबाबतही दरवर्षी दराबाबत गोंधळ सुरू असतो. या दोन्ही पिकांच्या किमती वाढल्या की सर्वसामान्य नागरिक हैराण होतात आणि त्याच्या किमती कमी झाल्या तर शेतकर्‍यांच्या खिशात काहीच पडत नाही. दरवर्षीच अशा अनेक पिकांबाबत हा दराचा आणि किमतीचा गोंधळ सुरू असूनही अद्याप त्यावर तोडगा निघालेला नाही. कधी कांद्याच्या निर्यातीवर बंदी घालायची, तर कधी ती निर्यात बंदी उठवायची याव्यतिरिक्त कोणते वेगळे धोरण सरकारी पातळीवर आखले जात आहे, असेही दिसत नाही.साहजिकच मंत्रिमंडळाने घेतलेले हे जे सात निर्णय आहेत ते वरवर जरी आदर्श वाटत असले, तरी कोणत्याही शेतकर्‍याच्या विकासासाठी त्याला त्याच्या शेतमालासाठी चांगला पैसा मिळवून देणे हेच उद्दिष्ट समोर ठेवून काम करणे नेहमी महत्त्वाचे असते. मुळात भारतीय शेती पावसावर अवलंबून आहे आणि हा पाऊस जर कमी झाला तर शेतीचे नुकसान होतेच आणि अतिवृष्टी झाली तरीसुद्धा शेतीचे नुकसान होते. देशात अद्यापही शंभर टक्के जलसिंचनाचे उद्दिष्ट पूर्ण झाले नसल्याने पावसावर अवलंबून असणारी शेती नेहमीच बळीराजाला संकटात टाकत असते.या सर्व मूलभूत गोष्टींचा विचार करण्याऐवजी डिजिटल यंत्रणांचा वापर करण्याचा आधुनिक विचार केला जात आहे. आधुनिक काळामध्ये जरी डिजिटल यंत्रणा वापरणे अपरिहार्य असले तरी भारतातील अनेक खेड्यांमध्ये अद्यापही शेतकर्‍याला 24 तास वीज उपलब्ध होत नाही. तो शेतकरी या डिजिटल यंत्रणेचा वापर तरी कसा करणार, हा एक प्रश्नच आहे. एखाद्या वर्षी शेतकर्‍याला चांगले उत्पादन मिळाले तरी योग्य दर मिळेपर्यंत ते उत्पादन साठवण्याची क्षमताही अनेक शेतकर्‍यांकडे नसते. कारण शेतीमाल हा नाशवंत असल्यामुळे कोल्ड स्टोरेजचीसुद्धा पुरेशा प्रमाणात भारतामध्ये अद्याप सोय झालेली नाही. काही मोठ्या बाजार समित्यांमध्ये जरी अशा प्रकारची कोल्ड स्टोरेज असली तरी ती पुरेशी पडत नाहीत. या सर्व मूलभूत सुविधांचा प्राधान्याने विचार केला आणि त्या दिशेने प्रथम प्रयत्न केले, तरच शेतकर्‍याला आपले काम करणे सोपे जाणार आहे. ज्या अर्थी महाराष्ट्रासारख्या देशातील सर्वात प्रगत राज्यामध्ये अजूनही शेतकर्‍यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढतच चालले असेल तर त्या अर्थी शेतकर्‍यांच्या सर्व समस्या सोडवण्यात अद्यापही सरकारला यश आलेले नाही, हाच एक निष्कर्ष काढता येऊ शकतो. शेतकर्‍याचे कर्ज माफ करणे किंवा त्याच्या कर्जावरील व्याज माफ करणे अशा प्रकारच्या योजना केवळ वरवरची मलमपट्टी करण्याचे काम करत असतात. मुळात शेतकर्‍याने कर्जबाजारी होऊ नये आणि घेतलेले कर्ज त्यांनी फेडावे अशा प्रकारची परिस्थिती निर्माण करण्याचे काम सरकारी पातळीवर कधी होणार आहे, या प्रश्नाचे उत्तर आता शोधावे लागणार आहे. देशातील बळीराजाला सर्व मूलभूत सुविधा मुबलक प्रमाणात उपलब्ध करून दिल्या, तरच शेती फायदेशीर ठरू शकते आणि त्यानंतरच शेतकर्‍याचे उत्पन्न वाढवण्याचा विचार प्रत्यक्षात येऊ शकतो, हे लक्षात घेतले पाहिजे.

पान १ वरून

# तोडगा निघाला..

### सरकार 'त्या' कर्मचार्‍यांवरील केस मागे घेणार

कामगार नेते किरण पावसकर यांनीदेखील या बैठकीनंतर प्रतिक्रिया दिली. 'मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून आभार मानावे लागतील. गोपीचंद पडळकर यांनी संपाबाबत आधीच कल्पना दिली आहे. ज्या मागण्या मान्य करण्यासाठी आम्ही गेलो होतो. एसटी कर्मचार्‍यांना सडळ हस्ते मदत मिळाली आहे. जे कर्मचारी गेल्या सहा महिन्यांपासून घरी बसले आहेत, छोट्या केसेस आहेत, शंभर रुपयांची किंवा पन्नास रुपयांची केस असेल, दहा, वीस रुपयांच्यी केस असेल, त्या सर्व कर्मचार्‍यांची कारवाई संपवून त्यांना कामावर घ्या, अशा पद्धतीचा आदेश या बैठकीत देण्यात आलेला आहे. 2020 पासून 2024 पर्यंतची थकबाकी देखील कर्मचार्‍यांना टप्प्याटप्प्याने मिळणार आहे. सरकारच्या या निर्णयामुळे कर्मचार्‍यांमध्ये आनंदाचं वातावरण आहे. महाराष्ट्रात ही पहिली वेळ आहे की, सर्व २३ संघटनांचे कर्मचारी होते ते सर्व आनंदी झाले आहेत. मी पुन्हा एकदा सरकारचा आभारी आहोत', अशी प्रतिक्रिया किरण पावसकर यांनी दिली. 'यात सर्वात महत्त्वाची गोष्ट सांगायची राहिली, 250 डेपो आहेत, काही डेपो रिपेअर करायचे आहेत, कर्मचार्‍यांचे रेस्ट रुम आहेत, ते सर्व रेस्ट रुम रिपेअर केले जातील, असं सरकाने सांगितलं आहे', अशी माहिती पावसकर यांनी दिली. राज्य सरकारी कर्मचार्‍यांप्रमाणे आम्हाला वेतन मिळावं. राज्य सरकारी कर्मचार्‍यांप्रमाणेच महागाई भत्ता मिळावा. राज्य सरकारी कर्मचार्‍यांप्रमाणेच घरभाडं भत्ता मिळावा. एसटी कर्मचार्‍यांना सरसकट 5 हजार रुपयांची वेतनवाढ मिळावी, अशा आंदोलकांच्या प्रमुख मागण्या होत्या.

प्रबोधन

# विज्ञानने केल स्वर्ग या जगाच

ज्ञानाने धार्मिक-आध्यात्मिकांचं काय घोडं मारलं कोण जाणे, पण विज्ञानाची महती सांगणाऱ्यांवर तुटून पडणं हा त्यांचा स्वीकृत धर्म आहे. बहुतेक प्रवचनकार, बुवा-महाराज, मार्गदर्शनात सद्गुरू- परमपूज्य आपल्या विज्ञानावर हटकून तोंडसुख घेत असतात. जगातलं सर्वोच्च सत्य काय ते आपणच जाणतो; ते म्हणजे ईश्वराची सत्ता आणि आत्म्याची अमरता! या दोन्हींच्या पुढे बाकीचं सर्व ज्ञान- विज्ञान त्यांच्यामते महाशून्य असतं.

पण वस्तुस्थिती उलटी असते. विज्ञानाला नावं ठेवणारे हे अध्यात्म मार्गदर्शक आपलं म्हणणं अनुयायांपर्यंत पोहचवण्यासाठी माईकचा (ध्वनिवर्धकाचा) उपयोग करीत असतात. परमपूज्यांच्या डोळ्यांवर बायफोकल चष्मा लावलेला असतो. खोकला आला की, शिष्य त्यांना ॲलोपॅथीची गोळी आणि एनरिच्ड मिनरल वॉटर(एक्स्ट्रा ऑक्सिजनयुक्त) देतो. मशीन एम्ब्रॉयडरीची शाल, टेरिकॉट अधिक इजिप्शियन कॉटनयुक्त तलम धोतर, चायना सिल्कचे लोड, फोमची थर्मोस्टेट गादी असा एकूण विज्ञानाधारित परिवेश असतो. दर्शन सोहळ्यासाठी ए.सी. रूममध्ये परमपूज्य मोबाईलवरून रटर घेत व पाठवत असतात. मधूनच मिसेसशी लँडलाईनवर क्षेमसमाचाराचंही बोलून घेतात. सेक्रेटरीला मुंबई-दिल्ली-कलकत्ता- मद्रासची फ्लाइट ऑनलाईनवरून बुक करायला सांगतात. यामुळे त्यांच्या सहवासातील विज्ञानाने ठेल स्वग शहाण्या माणसाचं डोकं क्षणाक्षणाला सणकत असतं. खाल्ल्या घरचे वासे मोजणाऱ्या या परमपूज्याचा त्याला संताप येत असतो. विज्ञानाची निंदा करणाऱ्या या सद्गुरूचं विज्ञानाशिवाय एकही पान हलत नाही, हे त्याला कळत असतं. मग, मन म्हणतं-

विज्ञाना निंदती ।लाभ घेवोनिया
जग सोडूनिया । का न जाती? ॥१॥
माईक लावूनिया` वीज जाळुनिया
कॅमेऱ्यापुढे बुवा। कीर्तन करी ॥२॥
अशा कृतघ्नाचे ।तोंड सदा काळे
विज्ञाना जो बोले` अपशब्द`३
विज्ञानाची सुखे। जर नष्ट झाली
बुवा आदिमकाळे भोगतील ॥ ४ ॥
आदिमानवाला ।जंटलमन केले
देवाने नव्हे हो। विज्ञानाने ॥ ५ ॥
ओसाड पृथ्वीचे । उपवन झाले
देवाने न केले । विज्ञानाने ॥ ६ ॥
अंतरिक्षामध्ये । पाऊल टाकले
देवाच्या न बळे विज्ञानाच्या ॥७॥
स्वामी सर्व जगा। विज्ञानचि आहे
त्याच्यापुढे आहे। देव खोटा ॥८॥

आध्यात्मिक बुवा महाराज बाजारूच असतात. पण समाजातील आचार्य, प्राचार्य, पीएच.डी. प्राप्त विद्वान (?), व्याख्याते, देशी- विदेशी शास्त्रज्ञ, (त्यात काही अग्रियान सफल व्हावं म्हणून यज्ञ करावा, म्हणण्याइतके देशी की गावंढळ आहेत.) विविध विश्वविद्यालयात व्हिजिट करणारे विद्वान, शिवाय एम.डी., एम.एस.एफ.आर.सी.एस., डी.एन.बी. इत्यादी झालेले तज्ज्ञ डॉक्टर्स, नावाजलेले वकील, न्यायाधीश आणि लौकिकप्राप्त संपादक- पत्रकार, लेखक-लेखिका, कवी-कवयित्री (यात आपल्या कथा-कादंबरीत भुताचं आगमन दाखवणारे गचाळ मेंदूचे गावठी शेक्सपियर) यांनीही जर विज्ञानाची निंदा आणि अध्यात्माची स्तुती करण्याचा उद्योग केला, तर जगबुडीच झाली म्हणायची! या सर्वांच्या लेखन - मार्गदर्शनानुसार शाळेत- महाविद्यालयात शिकवणारे आहेत.

त्यांच्याही तोंडून वरच्यांसारखीच वाचकांची पसंती पोपटपंची ऐकण्यास मिळते आणि त्याची ही पावती त्यातून विकृती निपजते.

शाळा-कॉलेजात। फिजिक्स शिकवी
संकष्टीही करी। भक्तिभावे ।।
यांच्यापेक्षा बरा। अडाणी माणूस
तकार्ने वागतो। जन्मभर ॥

शेवटी तकार्ने वागणं हेच महत्त्वाचं, रामदासांनी तर्काविषयी म्हटलं आहे, तर्क तो अर्क जाणावा, नर्क संपर्क चुकवी । तकार्ने आपण फार लांबचा नको, पण इतिहासपूर्व काळ थोडा विचारात घेऊ. (तेव्हाही आध्यात्मिकांचा ईश्वर विद्यमान होता, असं मानू.) तेव्हा गुहेत राहाणारा मानव पशुतुल्य जीवन जगत होता. तो विद्या- कला-कौशल्यशून्य, आचार-विचारशून्य होता. शुद्ध जंगली होता. या माणसाची आजच्या महानगरातील सुधारलेल्या माणसाशी तुलना करा. आध्यात्मिकांच्या सर्वसत्ताधीश देवाने त्यां रानटी माणसावर जादूची कांडी किंवा आशीवार्दाचा मंत्र फुंकून त्याचं रूपांतर आजच्या स्वयंपूर्ण माणसात का केलं नाही? माणसाची आणि त्याच्या भोवतीची सुधारणा-प्रगती दिसते, ती आपोआप घडलेली नाही. यामागे असंख्य शास्त्रज्ञांचे अविरत कष्ट आहेत. संशोधन आहे. विज्ञानाची ही भक्तीच, आज अनेक सुखांची बरसात आपणावर करीत आहे. अशा विज्ञानाची स्तुती- भक्तीच आपण केली पाहिजे. कारण-

विज्ञानावाचूनी । सापडेना सोय
धरावे ते पाय । आधी त्याचे ॥१
विज्ञानाने केला । स्वर्ग या जगाचा
उपकार त्याचे। किती वर्णू ॥२
विज्ञाना शरण। जाऊनिया होई
मानवाचे हित । अखंडित ॥३
विज्ञानाची निंदा। करी तोचि मूर्ख
जन्म त्याचा नरक । जितेपणी ॥४

परमपूज्य-बुवामहाराज विज्ञानाची निंदा करू देत. पण शहाण्यांनी तरी या मूखार्ना साथ देऊ नये.



- डॉ. जे. बी. शिंदे

प्रबोधन

# उत्सवाने व्हावे । जनप्रबोधन

भक्ती करणारी माणसं जगभर सापडतील, पण पूजनवेडी माणसं भारताखेरीज अन्यत्र जगात कोठेही आढळणार नाहीत. म्हणून पूजनवेड्या लोकांचा देश हीच आपल्या देशाची खरी ओळख आहे. आपण जिची पूजा करतो ती बाब सजीव आहे की निर्जीव, हेसुद्धा न पाहाता उत्साहाने पूजन करणं, ही आपली राष्ट्रीय सवय झाली आहे. अशा उत्साहाबद्दल विचारवंत लिमिंग म्हणतात, ह्यउत्साहाबरोबर कल्पकताही हवी. कल्पनाशक्ती नसलेला उत्साही माणूस चक्रम असतो,' अशा उत्साही पूजनातूनच लोकमान्य उत्सवांची निर्मिती होत असते. मात्र कल्पकताशून्य उत्साहाचं गणेशोत्सवाइतकं लोकमान्य वेडेपण दुसरं कोणतंही नसेल, असं आज खेदानं म्हणावं लागेल. प्रबुद्ध लोकांना तो गणेश मॅनिया असं वाटतं, ते त्यामुळेच ! उत्सव हे व्यक्तिजीवनासाठीही आवश्यक असतात आणि राष्ट्रीय जीवनासाठीही आवश्यक असतात, यात वाद नाही. उत्सवाची आवश्यकता सांगताना गणेशोत्सवाचे प्रणेते लोकमान्य टिळक म्हणतात, ह्यराष्ट्र कितीही गरीब वा परतंत्र असो, पण त्याला जर उत्सव माहीत नसेल, तर ते राष्ट्र पशूंचं होय. माणसांचं नव्हे.' लोकमान्य टिळकांनी खऱ्या उत्सवाबाबतची आपली कल्पनाही स्पष्ट शब्दांत व्यक्त केली आहे, ते म्हणतात, 'खरा उत्सव म्हणजे ज्यापासून आपल्या प्रगतीला मदत होते तो!' एकूण राष्ट्रविकासाला हातभार लावणारा उत्सव हा निकष लावणं आणि तो पूर्ण होत नसेल, तर अशा उत्सवाचा समाजाने पुनर्विचार करावा म्हणून सत्याग्रह धरणं, हे विचारवंतांचं कार्यच आहे. गणेशोत्सवातून राष्ट्रीय अस्मिता निर्माण करण्याचं कार्य एकेकाळी लोकमान्य टिळकांनी केलं. पण आज ह्या उत्सवात श्रद्धा, भक्ती, अस्मिता, लोकजागरण, राष्ट्रनिष्ठा, प्रगतिशीलता, प्रेरणा यापैकी काहीही शिल्लक राहिलेलं नसून हुल्लडबाजी, गुंडागर्दी, देखावेबाजी, धंदेवाईक स्पर्धा, मवालीपणा, कायदा आणि सुव्यवस्थेचं जाणीवपूर्वकं उल्लंघन गटतटबाजी, धर्मांध विद्वेषवृद्धी, ध्वनि-जल-वायू-प्रदूषण, वर्गणीवसुलीची दहशत, असे किती असामाजिक अपप्रकार बोकाळले आहेत.

विचारवंत शिवाजीराव भोसले म्हणतात, 'लोकमान्यांनी गणेशभक्तीला लोकात्सवाचं रूप दिलं म्हणतात, पण स्वतः लोकमान्य देवपूजेत किंवा पोथीवाचनात रमत नव्हते. आजचे हजारो गणपती विसर्जनाच्या मिरवणुकी व परमार्थाच्या नावाखाली वातावरणाचं प्रदूषण टिळकांना अभिप्रेत नसावं. ' गणेशोत्सव हा उत्तरोत्तर समाजपीडक होत चाललेला उत्सव असूनही पत्रकार, दूरचित्रवाहिन्या, उत्सवाचे प्रायोजक उद्योगपती मात्र त्याला डोक्यावर का घेताहेत? त्याचा उदोउदो करण्याची लाचारी, भिक्षुकीवृत्ती का करताहेत, हे काही फार मोठे शोध घ्यावे, असं गुपित नाही. महाराष्ट्राची भूतकाळातील पत्रकारिता झुंजार होती. पुरोगामित्व निष्ठापूर्व जोपासणारी होती. समाजाचा अधःपात रोखण्यासाठी प्रखर बुद्धिनिष्ठ गो. ग. आगरकर लिहितात, ह्यलोकमताच्या बागुलबुवाला न भिता समाजातील दोष दाखवून लोकांनान आवडणारे; पण पथ्यकारक असे विचार देणारे विचारवंत ज्या समाजात असतात, त्या समाजाचा -हास होण्याची भीती नसते.'अलीकडे मोठ्या शहरांतून गणेश फेस्टिव्हल आयोजित करण्याची कल्पकता दाखवली जात आहे. पण ह्या फेस्टिव्हल संस्कृतीने समाजसन्मुखता, बौद्धिक जागरण, समाजोद्धारक पथनाट्यं, व्यसनमुक्तीविषयक पोस्टर स्पर्धा, समाजससेवकांचं गुणगौरव, प्रबोधनविषयक विचारांचं प्रसारण, सामाजिक समस्याविषयक परिसंवाद, थोर साहित्यसेवकांचा सन्मान अशा विविध उपक्रमांची रेलचेल करून टाकली, तर एका वेगळ्या दृष्टीने, निकोपपणे प्रत्येकजण ह्या उत्सवाचं स्वागत करील. यासाठी लक्षात ठेवा-

उत्सवाने व्हावा। राष्ट्राचा विकास
लोक- आनंदास । पूर यावा ॥ १
उत्सवाने व्हावे । जनप्रबोधन
विकासाचे ज्ञान । सर्वकष ॥ २
राष्ट्रपुरुषांच्या जयंती-मयंती
राष्ट्रदिन देती । प्रेरकता ।। ३
उत्सव थोरांच्या नावांनी
करावे देवांचे करावे। थेर पुरे ॥४



- डॉ. जे. बी. शिंदे

# यंदा आमच्या घरी माझेच गणपती बसवणार

## नेताजी प्रशालेच्या विद्यार्थ्यांचा अनोखा निर्धार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत कला विभाग, स्काऊट गाईड विभाग व इको क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण पूरक गणेश मूर्ती कार्यशाळा घेण्यात आली .या कार्यशाळेत १७५ विद्यार्थ्यांनी माती पासून गणेश मूर्ती बनविले. या सर्व विद्यार्थ्यांना अक्कलकोटचे प्रसिद्ध मूर्तिकार शिवशंकर कुंभार यांनी मार्गदर्शन केले.प्रात्यक्षिकद्वारे माहिती सांगत पंधरा टप्प्यातून गणेश मुर्ती बनविण्यासाठी टिप्स दिले. माती ओलसर करण्यापासून ते शेवटच्या फिनिशिंगपर्यंत लहान सुक्ष्म गोष्टी,आकार व आकर्षकता आणण्यासाठी कृती समजावून सांगितले. तळ, सिंहासन, पोट,पाय,हात,तोंड,कान,सोंड अशा क्रमाने कृती करुन घेण्यात आले. १७५ विद्यार्थ्यांना शाळेकडून सर्व साहित्य पुरविण्यात आले. विद्यार्थ्यांना टप्याटप्याने शिस्तबद्धरीतीने बसवून प्रात्यक्षिके करुन घेण्यात आले. आकर्षक रंगसंगती कशी करावी याचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आनंदाने या उपक्रमात सहभाग घेतले. यंदा स्वतः बनवलेली गणेश मुर्ती घरात स्थापना करणार असल्याचे विद्यार्थ्यांनी निर्धार केला. सजावट, पूजा पाठ मांडणी, आरती, सामुहिक पूजेची महत्त्व समजावून सांगितले. संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले. याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार ,पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, इको क्लबचे प्रमुख शिवकुमार शिरुर, प्रशालेचे कलाशिक्षक तथा स्काऊटर शैलेश स्वामी, खेळ शिक्षक अशोक पाटील आदी उपस्थित होते.

### वात्रटिका

## जे हवे ते देऊ

लाडकी बहिण झाली
तसा भाऊ पण झाला...
नंबर लागलेत इथं अनेक
बघा कोणाचा नंबर आला....
काही मिळवायचे असेल
तर काही वाटले पाहिजे..
लाडक्या बहिण भावला
भावाचे प्रेम पटले पाहिजे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

# सोलापूर लोकसभा मतदारसंघातील..

पवार, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, माजी आमदार दिलीपराव माने, जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, माजी नगरसेवक संजय हेमगड्डी, महादेव कोगनुरे, मनोज यलगुलवार, आरिफ शेख, रियाज हुंडेकरी, नगरसेवक विनोद भोसले, शिवा बाटलीवाला, मा. नगरसेविका फिरदौस पटेल, मिनलताई साठे, महिला अध्यक्ष प्रमिला तूपलवंडे, अंबादास बाबा करगुळे, सुशील बंदपट्टे, अशोक निम्बर्गी, सुदीप चाकोते, तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी, प्रशांत साळे, अमर सूर्यवंशी, राजेश पवार, शालिवाहन माने देशमुख, भारत जाधव, दादा साठे, किशोर पवार, आदित्य फत्तेपूरकर, तिरुपती परकीपंडला, रवी यलगुलवार, शौकत पठाण, भीमाशंकर टेकाळे, राज सलगर, बसवराज म्हेत्रे, मयूर खरात, शफी हुंडेकरी, युवराज जाधव, शकील मौलवी, सातलिंग शटगार, लक्ष्मण भोसले, राहुल वर्धा, राहुल गोयल, राजन कामत, कोमोरो सय्यद, अभिषेक कांबळे, हसीब नदाफ, सचिन गुंड, शाहू सलगर , संदीप सुरवसे, राजकुमार पवार, रुकय्या बिराजदार, राधाकृष्ण पाटील, श्रीशैल रणखांबे, संजय गायकवाड, चंद्रकांत टीक्के, अजिंक्य गायकवाड, हणमंतू रुपणर, यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# प्रगल्भ शिक्षकनिर्मिती कधी.....?

जीने की कला सिखाते शिक्षक.... ज्ञान की कीमत बताते शिक्षक.... पुस्तकों के होने से कुछ नही होता.... अगर मेहनत से नहीं पढाते शिक्षक....

५ सप्टेंबर शिक्षक दिन. शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांच्या विशेष योगदानाबद्दल त्यांचा सन्मान करण्यासाठी हा दिवस देशभर साजरा केला जातो. शिक्षक दिन साजरा करण्याची कल्पना १९ व्या शतकात अनेक देशांमध्ये रुजली. वेगवेगळे देश हा दिवस वेगवेगळ्या तारखांना साजरा करतात. भारतात दुसरे राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस ५ सप्टेंबर १८८८ हा १९६२ पासून शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. शिकविर्णायाला शिक्षक (टीचर) म्हणतात. शिष्याच्या मनात शिकण्याची इच्छा जागृत करु शकणारेच खरे शिक्षक असे म्हणता येईल. तर मुलांचा पहिला रोल मॉडेल शिक्षक असतो. शिक्षक कसा असावा हे ठरवण्याआधी शिक्षण म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक आहे. कारण शिक्षकाची भूमिका व त्याचे कार्य हे शिक्षणाशी व विद्याथ्यार्शी जोडलेले आहे. शिक्षक आणि शिक्षण हे हातात हात घालून चालत असते. शिक्षणातून काय साध्य करायचे आहे हे ध्यानी घेतल्याशिवाय कुठलाही शिक्षक उत्कृष्टतेकडे वाटचाल करू शकणार नाही. जे ज्ञान मनुष्यामध्ये आधीचेच निहीत असते, त्याचे प्रकटीकरण म्हणजे शिक्षण होय! शिक्षणासाठी शाळा ही केवळ विटांनी बांधलेली नसून ती आजीवन शिक्षणाची केंद्रे आहेत. ज्ञान ही शक्ती आणि शिक्षण हे इंधन! देशभरातील शाळा हळूहळू पण निश्चितपणे स्वतःची पुनर्रचना करत आहेत त्यामुळे शिक्षकांनाही परंपरेनुसार चालत आलेले शिक्षण, पद्धती आणि स्वतःला बदलावे लागत आहे. खरे तर परंपरेने, शिक्षकांना काय, केव्हा आणि कसे शिकवायचे हे सांगितले. शिक्षण म्हणजे वळण आहे! दळण नव्हे! शिक्षणाचा मुख्य उद्देश संस्काराचे बीजारोपण हे आहे. त्यामुळे विद्यार्थ्याच्या शरीराला व मनाला योग्य वळण लावणे हे शिक्षणाचे व पयार्याने शिक्षकाचे कार्य आहे. विद्यार्थ्याच्या डोक्यात अधिकाधिक माहिती कोंबणे आणि ती परीक्षेसाठी पुन्हा पुन्हा दळून घेणे हा शिक्षणाचा मूळ हेतू नाही, हे आजच्या काळातील शिक्षकाने समजून वागले पाहिजे. दळण्यापेक्षा शिक्षणप्रक्रियेत वळणाला अधिक महत्त्व आहे हे कायम ध्यानी ठेवायला हवे.

आजच्या डिजिटल युगात, शिक्षकांची भूमिका केवळ उपदेशकापासून गुरूकडे वळली आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि त्यांच्या ज्ञानाचे अंतिम लक्ष्य सुंदर चारित्र्य निर्माण होणे हेच असले पाहिजे. चारित्र्याशिवाय ज्ञानाला आणि चारित्र्यहीन ज्ञानी माणसाला मान नाही. म्हणून ज्ञान मिळवण्याच्या प्रक्रियेचा शेवट हा सुंदर चारित्र्य निर्मितीतच व्हायला हवा. शिक्षणाचा हा हेतू लक्षात घेऊनच शिक्षकाने शिकवले पाहिजे. आपापल्या विषयात नैतिक शिक्षणातून विविध प्रकारचे संस्कार कुठे व कसे करता येतील याचा विचार प्रत्येक शिक्षकाने केला तर सुंदर चारित्र्यनिर्मितीचे शिक्षणाचे ध्येय गाठता येणे कठीण नाही.

शिकवणे म्हणजे माझा विषय शिकवणे ही वृत्ती नव्या जमान्यातील शिक्षकांच्या मनातून हद्दपार व्हायला हवी. शिक्षक हा पाठ्यपुस्तकाचा नसावा. तो एखाद्या विशिष्ट विषयाचाही नसावा. शिक्षक हा विद्याथ्यार्चा असावा! हा मूलभूत विचार नव्या पिढीतील शिक्षकासमोर त्याला समजेल अशा पद्धतीने आणि त्याला रूचेल अशा रीतीने मांडला पाहिजे. शिक्षणाकडे बघण्याचा निकोप दृष्टिकोन एखाद्या शिक्षकाला लाभला म्हणजे मग पुढच्या गोष्टी त्याला सांगाव्या लागणार नाहीत. दुर्दैवाने शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमात वर्गात शिकवण्यासाठी आवश्यक ती तंत्रे शिकवली जातात. परंतु शिक्षणाकडे बघण्याचा शुद्ध दृष्टिकोन प्रदान करण्याची सोय या अभ्यासक्रमात नाही. त्यामुळे प्रशिक्षण घेऊन बाहेर पडर्णाया बिचार्‍या शिक्षकाला शिक्षण म्हणजे काय व शिकवणे म्हणजे काय हे ठावूक नसते. शिक्षणाची मूळ संकल्पनाच स्पष्ट नसलेला शिक्षक मुलांमध्ये कसल्याही प्रकारचे ज्ञान, कौशल्य व चारित्र्य यांचे बीजारोपण करू शकत नाही. अलीकडच्या काळात शाळाही मार्क्सवादी बनल्यामुळे शिक्षकांना समृद्ध बनवण्यासाठी शाळांकडे वेळ नसतो. एकदा प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकालाही निरंतर प्रशिक्षणाची आवश्यकता असते याचा विचार फार कमी शाळा करतात. त्यामुळे नोकरीला लागताना शिक्षक जसा असतो, तसाच तो बर्‍याचवेळा निवृत्त होतो. त्याच्या कौशल्यात, ज्ञानात कसल्याही प्रकारचा बदल झालेला दिसत नाही. प्रशिक्षण विद्यालयात देशाचे भवितव्य घडवण्याची फार मोठी जबाबदारी असलेल्या भावी शिक्षकांना शिकवतात. अशा बिकट परिस्थितीत चांगला शिक्षक सापडणे कठीण होऊन बसले आहे.

प्रगल्भ शिक्षकनिर्मिती हा आजच्या काळातील शिक्षण क्षेत्रातील ऐरणीवरचा विषय मानायला हवा असे वाटते. सर्व शिक्षकांना शिक्षक दिनानिमित्त हार्दिक हार्दिक शुभेच्छा....

**- प्रा. तात्यासाहेब शिवाजी काटकर,**
अकलूज, 9226144836
(लेखक करिअर समुपदेशक असून शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. शैक्षणिक, सामाजिक विषयावर लेखन करतात)

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# इको-फ्रेंडली गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** ज्युनिअर्स ग्लोबल प्रि-स्कूल, जगताप अबॅकस क्लासेस आणि डिजिटल जगताप क्लासेस बार्शी तसेच इनरव्हिल क्लब, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने डिजिटल जगताप क्लासेस येथे १ सप्टेंबर २०२४ रोजी इको-फ्रेंडली गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळेचे उद्घाटन इनरव्हिल क्लबच्या गौरी रसाळ, विनिता भानुशाली आणि वृक्ष संवर्धन चे उमेश काळे, आनंद धुमाळ इ. च्या हस्ते जिजाऊ माँसाहेब, छत्रपती शिवाजी महाराज आणि ज्योतीबा-सावित्रीआईच्या प्रतिमा पूजन करून झाले. सदर कार्यशाळेस बाशीर्तील विद्यार्थ्यांनी उदंड प्रतिसाद दिला. या कार्यशाळेत मूतीर्कार अंकुर कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण पूरक गणपती बनविण्याचे प्रात्यक्षिक दिले, विद्यार्थ्यांनी सुंदर आणि सुरेख अशा पर्यावरणपूरक गणेश मूर्ती निर्माण केल्या, सर्व मूर्त्यांचे मूतीर्कार अंकुर कुलकर्णी यांनी परिक्षण करून त्या खालील विद्यार्थ्यांनी पारितोषिके पटकावली क्रमांक एक कु. आरोही राजकुमार जराड, द्वितीय क्रमांक कु. राजवी श्रीगणेश शेळवणे तृतीय क्रमांक कु. आदिती विशाल बागल आणि उत्तेजनार्थ कु. कन्हेरे ह्या विद्यार्थ्यांना इनरव्हिल क्लबच्या गौरी रसाळ, प्रणाली जगताप आणि तानाजी गलांडे यांच्या हस्ते पारितोषिक आणि प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले, चारुदत्त जगताप आणि किरण गायकवाड यांनी मान्यवरांचा सत्कार केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रणाली जगताप यांनी केले तर सूत्रसंचालन पठाण मॅडम आणि आभार प्रदर्शन तानाजी गलांडे यांनी केले. ही कार्यशाळा पार पाडण्यासाठी बोधले मॅडम, पवार मॅडम, धामणेकर मॅडम, शिंदे मॅडम, धुमाळ मॅडम, गुंड मॅडम आणि कुलकर्णी मॅडम यांनी परिश्रम घेतले.

# महिलांनी कायद्याचे संरक्षण आणि योजनांचा लाभ घ्यावे - अ‍ॅड. स्नेहल राऊत

## महिला विषयक कायदे मार्गदर्शन शिबिर संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मुलगी पोटात असल्या पासून आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर तिच्या संरक्षणासाठी कायदा खंबीरपणे तिच्या पाठीशी उभा आहे. तसेच सरकारनेही प्रत्येक महीला मग ती आर्थिक, मानसिक, शारीरिक, सामाजिक, विधवा, परीत्यक्ता, वृध्द असेल तिला स्वयंसिद्धा बनवण्यासाठी सरकारी योजना आणल्या आहेत. तरीही अप्रिय व दुर्दैवी घटना महीलांबाबत घडत आहेत. त्यामुळे महिलांना त्यांच्या हक्कासाठी आणि संरक्षणासाठी जागरूक असणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण मुख्य लोक अभिरक्षक अ‍ॅड.स्नेहल राऊत यांनी व्यक्त केले.

मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर श्री मो. सलमान आझमी व सचिव उमेश देवर्षी यांच्या मार्गदर्शनाखाली

मंगळवार दिनांक 2 सप्टेंबर रोजी मोदी परिसरातील मसिहा



नगर येथील मसिहा सामाजिक बहुउद्देशीय संस्था व सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांविषयक कायदे व योजना मार्गदर्शन शिबिराचे आयोजन पास्टर मंचले यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी व्यापीठावर सामाजिक कार्यकर्ते अमित मंचले, अ‍ॅड.मोहन कुरापाटी, अ‍ॅड. अनिल वासम, डॉ. नोव्हेल अनमोल आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अ‍ॅड. झुरळे यांनी भारतीय संविधानातील कायदा सर्वांसाठी समान आणि संधीची समानता यावर प्रकाश टाकले.तसेच सर्वसामान्य लोकांसाठी विधी सेवा प्राधिकरण कोणत्या प्रकारचे काम करते याची माहिती दिली. यावेळी संयोजक अ‍ॅड.मोहन कुरापाटी यांनी ही मार्गदर्शन केले. यानंतर शंका - समाधान प्रश्नोत्तरे सत्र पार पडले.

प्रास्ताविक अ‍ॅड.अनिल वासम यांनी केले. सूत्रसंचालन शाम आडम यांनी तर आभार प्रदर्शन मसिहा संस्थेचे अध्यक्ष अमित मंचले यांनी केले. सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी अजय भंडारे,सिमोन पोगुल आणि संस्थेचे पदाधिकारी कार्यकर्ते आदींनी परिश्रम घेतले.

# खा धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या पत्रानंतर वासुद रेल्वे स्थानकांवर मुलभूत सुविधा प्रधान

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी सोलापूरच्या रेल्वे विभागीय प्रबंधकांना लिहलेल्या पत्रानंतर सांगोला तालुक्यातील वासुद रेल्वे स्टेशनवर लाईटची सुविधा उपलब्ध झाली तर स्टेशन परिसर व मार्गावरील वाढलेले कांटेदार वृक्ष काढून टाकण्यात आले.

सांगोला तालुक्यातील वासुद रेल्वे स्टेशनवर ये-जा करणाऱ्या रस्त्याच्या कडेला काटेरी वृक्ष वाढले आहेत. त्याचबरोबर या रेल्वे स्टेशनवर लाईटची सोय नाही. यामुळे रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवासी व विद्यार्थ्यांना याचा त्रास होत आहे. या ठिकाणी मूलभूत सुविधा कराव्यात व रेल्वे स्टेशन परिसर व रस्त्यावरील काटेरी वृक्ष काढून टाकावेत, अशी मागणी प्रवासी वगार्तून केली जात होती

सदर मागणी लक्षात घेऊन खासदार मा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सोलापूर विभागीय प्रबंधक यांना पत्र लिहून मुलभूत सुविधा उपलब्ध कराव्यात म्हणून सुचना केल्यानंतर वासुद रेल्वे स्टेशनवर मुलभूत सुविधा उपलब्ध करण्यासंदर्भात तात्काळ कार्यवाही सुरू झाली.



पंढरपुरचे रेल्वेचे वाणिज्य अधिकारी अमोल जोशी यांनी वासुद रेल्वे स्टेशनवर प्रत्यक्ष येऊन सुरू असलेल्या कामकाजाची पाहणी केली यावेळेस जोशी यांनी सांगितले स्टेशन परिसरातील व प्रवाशांच्या येणाऱ्या जाणाऱ्या मार्गावरील वाढलेले कांटेदार वृक्ष काढून टाकण्यात आले तसेच आणखी पंधरा दिवसांनी इतर मूलभूत सुविधांचे कामकाज करण्यात येईल याचबरोबर स्टेशन व परीसरात ६ दिवे बसवण्यात आले असल्याची माहिती सांगितली.

> वासुद रेल्वे स्थानकात असणाऱ्या गैरसोई बद्दल आम्ही वारंवार रेल्वे विभागाकडे तक्रार करून देखील दखल घेतली जात नव्हती आम्ही वासुदच्या नागरिकांनी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी याबाबत सांगितले यावर खासदार धैर्यशील भैय्यांनी विभागीय प्रबंधकांना सांगून आमचा प्रश्न तात्काळ मार्गी लावला याबद्दल आम्ही वासुदच्या ग्रामस्थांच्या वतीने खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांचे आभार मानतो
>
> **वैभव केदार,** नागरिक वासुद

# करमाळा पंचायत समितीच्या बिडीओ यांना जनशक्ती देणार होडी भेट

करमाळा (कटूसत्य वृत्त):- करमाळा पंचायत समिती कार्यालयाच्या आजूबाजूला अनेक सरकारी कार्यालये आहेत. त्या कार्यालयांना जाण्याच्या मार्गावर खूप मोठा खड्डा आहे. त्या मध्ये खूप मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी साचत असून संबंधित पाणी पुरवठा, लघु पाठबंधारे, भूमी अभिलेख, शिक्षण विभाग, महिला बालकल्याण विभाग या कार्यालयांना जाणाऱ्या अधिकारी आणि सर्व सामान्य जनतेला प्रचंड कसरत घ्यावी लागत असून याची तात्काळ दुरुस्ती करावी अन्यथा पंचायत समिती गटविकास अधिकारी यांना होडी भेट देऊन



आंदोलन करणार असल्याचा इशारा जनशक्ती संघटनेचे अध्यक्ष अतुल खुपसे-पाटील यांनी एका निवेदनाद्वारे दिला आहे.

या निवेदनात पुढे म्हटले आहे की, करमाळा तालुक्यातील लाखो नागरिकांच्या ग्रामीण सुख सुविधेचं प्रमुख केंद्र म्हणजे पंचायत समिती कार्यालय आहे. आणि तालुक्याच्या कार्यालयाची अशी अवस्था असेल तर ही शरमेची बाब आहे आणि या घटनेची आपण तत्काल दखल घेऊन संबंधित भागावर आपण मुरूम भरून अधवा योग्य ती उपाय योजना करावी अन्यथा आम्ही जनशक्ती संघटनेच्या वतीने शुक्रवार दिनांक ६ सप्टेंबर २०२४ रोजी होडी भेट आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी यावेळी दिला.

यावेळी राणा वाघमारे, गणेश वायबसे, अतुल राऊत, रोहन नाईकनवरे, कल्याण गवळी, शरद एकाड, अक्षय देवडकर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या कर्ज योजनांसाठी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत एन.एस.टी.एफ. डी.सी.नवी दिल्लीच्या धर्तीवर शासनामार्फत स्वयंरोजगाराच्या कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. जुन्नर येथील शबरी शाखा कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणारे पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, सोलापुर, कोल्हापुर, उस्मानाबाद, बीड, लातुर या जिल्ह्यातील आदिवासी लाभार्थ्यासाठी कर्ज योजना राबविण्यात येत आहे. या जिल्ह्यातील आदिवासी समाजातील इच्छुक उमेदवारांनी ६६६.ँरुँ६.ल्ल या संकेतस्थळाच्या माध्यमातुन दि. 15 सप्टेंबर 2024 पर्यंत ऑनलाईन कर्ज फॉर्म भरावेत, असे आवाहन जुन्नर शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे शाखा व्यवस्थापक रा.भ. पाटील यांनी केले आहे.

जुन्नर शाखा कार्यालयास सन 2024-25 साठी महिला सबलीकरण योजना (रु. 2 लक्ष)-22, कृषी आणि संलग्न व्यवसाय (रु. 5लक्ष)-6, हॉटेल ढाबा व्यवसाय (रु.5 लक्ष)- 6, ऑटो वर्क शॉप/ स्पेअर पार्ट (रु. 5लक्ष) -6, वाहन व्यवसाय (रु.10 लक्ष पेक्षा जास्त व रु. 15 लक्ष पर्यंत)-8 याप्रमाणे योजनानिहाय लक्षांक प्राप्त झाला आहे.

# संविधान बाबत खोट्या माहितींचा प्रसार रोखण्यासाठी मोहीम

## 'संविधान जागर यात्रा २०२४' चा चैत्यभूमी येथे समारोप

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भारत संविधान लागू झाल्याच्या ७५ व्या वर्धापनदिनानिमित्त केंद्र सरकारने 'संविधान जागर यात्रा २०२४' सुरू केली आहे. केंद्र सरकार 'संविधानअमृत महोत्सव' साजरा करत आहे. लोकांना त्यांच्या संवैधानिकअधिकारांची माहिती देणे आणि लोकशाहीविरोधी खोटी माहितींचा प्रसार रोखण्यासाठी हीमोहिम आखली आहे. संविधान जागर समिती या यात्रेचे आयोजक असून ८ सप्टेंबर रोजी मुंबईच्या दादर येथील चैत्यभूमीवर या यात्रेचा समारोप होणार आहे. सोलापूर जिल्ह्यातून अनेक जणांचा या यात्रेत सहभाग असून संविधान जागर समिती या यात्रेचे आयोजक आहे.

संविधान जागर यात्रेत कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे नातू राजेंद्र गायकवाड आणि वाल्मिक निकाळजे सहभागी झाले होते. विजयराव गव्हाळे , योजनाताई ठोकळे, स्नेहाताई भालेराव, नितीनभाऊ मोरे, आकाशजी अंभोरे, नागसेनजी पुंडगे आदी मान्यवर या यात्रेसाठी महाराष्ट्रभर फिरत आहेत.

या यात्रा ९ ऑगस्ट रोजी महाड येथून सुरू झालीअसून आता आता पर्यंत या यात्रेने संपूर्ण महाराष्ट्रात दौरा केला आहे. या माध्यमातून बाबासाहेब आंबेडकर यांच्या कल्पनेतील लोकशाही मूल्यांचे जतन करण्यासाठी तसेच संविधानाविरोधी वाढत्या विरोधी प्रचाराचा प्रतिकारकरण्यासाठी हि संविधान यात्रा आहे. लोकसभा निवडणुकीच्या




काळात आणित्यानंतर विरोधकांनी संविधानाबाबत खोटा प्रचार करून लोकांमध्ये शंका निर्माण केलीआहे. विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि अल्पसंख्याकसमुदायात भिती निर्माण झाली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी संविधानावर झालेल्या 'आघात'ला सर्वात मोठा धोका मानले आणि या मुद्द्यावरनिवडणूक मोहीम राबवली होती. काँग्रेसने केलेले आरोप कायदेशीर आधारावर टिकू शकणार नाहीत, सुप्रीम कोटार्ने 'केसवनंद भारती' निर्णयात संविधानाच्या मूलभूत रचनेलाबदलता येणार नाही असे स्पष्ट केले आहे. तरीही विरोधकांनी अनुसूचित जातींच्या लोकांमध्ये संविधान नष्ट होईल अशी भीती निर्माण केली असे समितीने म्हटले आहे. संविधानाबाबत लोकांना खरी माहिती समजूनघेण्यात अडचण येते. यामुळेच संविधान जागर समितीने या मोहिमेद्वारे लोकांनासंविधानाच्या मूलभूत मूल्यांची माहिती देण्याचा आणि विरोधकांच्या खोटी माहितीचीपोलखोल करण्याचा निर्णय घेतला आहे.

> "काही व्यक्तीप्रगतीवादाचे मुखवटे घालून शाहू, फुले, आणि आंबेडकर यांच्या नावाने खोटी अफवा पसरवत आहेत. या व्यक्तींनी शाही,फुले, आणि आंबेडकर यांच्या खऱ्या आदर्शाचासमज घेतला नाही आणि समाजात जातीय राजकारण पसरवून सामाजिक एकता तोडण्याचा प्रयत्नकरत आहेत. ही यात्रा त्यांच्या छुप्या अजेंड्याचा खुलासा करून जनतेला माहितीदेण्याचा प्रयत्न करेल."
>
> **- विजयराव गव्हाळे,** वक्ते, संविधान जागर समिती

# प्रा.अमरनाथ दुस्सा यांना तपोरत्नं गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कन्नड भाषा व कन्नड संस्कृती संवर्धक कुंभार समाज शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने दिला जाणारा यंदाचा सातवा तपोरत्नं गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रा. अमरनाथ वैकुंट दुस्सा यांना जाहीर झाला आहे. शिक्षक दिनाचे औचित्य साधून गुरुवार दि. ५ सप्टेंबर रोजी दुपारी ३.०० वाजता नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूल येथील तपोरत्नं सभागृहात आयोजित कार्यक्रमात संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.



सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरुप आहे. प्रा. अमरनाथ दुस्सा हे अतिशय मित्तभाषीय, विनयशील व अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. नेताजी सुभाषचंद्र बोस कनिष्ठ महाविद्यालयात वाणिज्य संघटन आणि व्यवस्थापन चिटणीसाची कार्यपद्धती हे दोन्ही विषय प्रभावीपणे अध्यापन करीत आहेत. शैक्षणिक कार्याबरोबरच आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रातही त्यांचा उल्लेखनीय कार्य आहे.पालक, विद्यार्थी व सहकारी शिक्षकांशी सलोख्याचे, स्नेहाचे, आपुलकीचे, प्रेमाचे व सहकार्याचे सहसंबंध असल्याने निलम नगर परिसरात विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून नावलौकिक आहे.

प्राचार्य रविशंकर कुंभार, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे,मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदींच्या निवड समितीच्या सदस्यांनी प्रा.दुस्सा यांची निवड केली आहे.

# संकटग्रस्त बालकांसाठी 1098 हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कोणत्याही प्रकारच्या अडचणीत, संकटात सापडलेल्या तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या 0 ते 18 वयोगटातील सर्व बालकांच्या त्वरीत मदतीसाठी चाईल्ड हेल्पलाईन सेवा 1098 हा क्रमांक संपुर्ण महाराष्ट्र राज्यात कार्यान्वित आहे. महिला व बालविकास विभाग, नवी दिल्ली आणि राज्य शासनाच्या बाल विकास विभागामार्फत ही हेल्पलाईन सेवा सुरु करण्यात आली आहे. या सेवेअंतर्गत संकटग्रस्त बालकांना 24. 7 हेल्पलाईन सेवा उपलब्ध आहे. सदर सेवेचा लाभ बालक स्वतः घेवू शकतो किंवा इतर कोणीही या सेवेद्वारे बालकाला मदत मिळवून देऊ शकतात.

१०९८ या टोल फ्री क्रमांकावर वर संपर्क साधून संकटग्रस्त बालकांना मदत करावी, असे आवाहन, महिला व बाल विकास विभागाचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी केले आहे.

(नोंदणी क्र.: एसयुआर/एमएचएल/पीआरडी (आय)/१०६/८६ दि. १२/०२/१९८६)

**चंद्रमौळी औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित मोहोळ ता. मोहोळ**

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस** (फक्त सभासदाकरिता)

सन्माननीय सभासद बंधु भगिनींनो, चंद्रमौळी औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित मोहोळ तालुका मोहोळ जिल्हा सोलापूर या संस्थेची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २४/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मोहोळ नागरी सहकारी पतपुरवठा संस्था मर्यादित मोहोळ मुख्यालयाचे सभागृह, मार्केट यार्ड, मोहोळ येथे खालील विषयांवर चर्चा करुन निर्णय घेणेसाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित रहावे, ही विनंती.

-सभेपुढील विषय-

१) मागील वर्षी दिनांक १६/०९/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) मा. संचालक मंडळाचा अहवाल व मा. लेखा परिक्षकाकडून तपासून आलेला दि. ३१/०३/२०२४ अखेरचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक वाचून स्विकृत करणे.
३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या दि. ३१/०३/२०२४ अखेरच्या नफा वाटणीस मंजूरी देणे.
४) सन २०२४-२०२५ या वर्षासाठीचे अंदाजपत्रकास मंजूरी देणे व मागील वर्षी अंदाजापत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
५) अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
६) वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
७) लेखा परिक्षण अहवाल दोष दुरुस्ती करणे व पुर्तता करणे.
८) मा. अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन — ए. एस. नाईक, प्र. व्यवस्थापक — कौशिक संदिपान गायकवाड, चेअरमन
स्थळ : मोहोळ
दिनांक : ०५/०९/२०२४
चंद्रमौळी औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित, मोहोळ जि. सोलापूर

विशेष सुचना :
१) गणपूर्ती (कोरम) अभावी सभा तहकूब झाल्यास सदर वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच अर्ध्या तासानंतर ठिक ११.३० वा. त्याच ठिकाणी, त्याच विषयांवर चर्चा करणेसाठी होईल. सदर सभेस गणपूर्ती (कोरम) ची आवश्यकता असणार नाही.
२) संस्थेच्या कामकाजासाठी प्रश्न किंवा माहिती आवश्यक असल्यास दि. २०/०९/२०२४ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात द्यावी. ऐनवेळी उपस्थित केलेल्या प्रश्नाविषयी अशी माहिती उपलब्ध करुन देणे केवळ अशक्य आहे.
३) सभासदांचा पत्ता बदललेला असल्यास व वारस नेमणूक केली नसल्यास संस्थेच्या कार्यालयात करावी.
४) संस्थेच्या सभासद भागीदारी, सहकारी कंपनी, न्यास आदी संस्थेच्या वतीने सभेस उपस्थित राहणाऱ्या प्रतिनिधींची नियुक्ती ठरावाद्वारे करावी व सभेस येताना संबंधित ठराव सोबत आणावा.
५) वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस, ही प्रत्येक सभासदांनी सभेस येताना सोबत आणावी, त्याशिवाय प्रवेश मिळणार नाही. याची नोंद घ्यावी.

**माढेश्वरी अर्बन मल्टीपल निधी लिमिटेड**

**रजिस्टर ऑफिस: 3470 तेलगिरणी चौक बार्शी सोलापूर** MH ४१३४११ IN

Email ID- madheshnidhi555@gmail.com CIN: U65990PN2018PLC180988

**६वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम २ (२०) आणि ९१ नुसार आणि कंपनी नियम, २०१४ आणि इतर लागू कायद्यांनुसार सर्व भागधारकांना याद्वारे सूचना देण्यात आली आहे, कंपनी ची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, ३० सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी १२.०० बाजता नोंदणीकृत कार्यालय 3470 तेलगिरणी चौक बार्शी सोलापूर MH ४१३४११ येथे आयोजित केली आहे. त्या मध्ये खालील व्यवहार केले जातील:-

सामान्य विषय

a) ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षासाठी लेखापरीक्षित बित्तीय विवरणे प्राप्त करणे, संचालकांचा अहवाल आणि त्यावरील लेखापरीक्षकांचा अहवाल विचारात घेणे आणि स्वीकारणे,

b) खालील ठराव एक सामान्य ठराव म्हणून विचारात घेणे आणि योग्य वाटल्यास, बदलांसह किंवा त्या शिवाय पास करणे, "निर्धारित केले, श्री. अशोक दगडूलाल लुणावत [DIN:08312540] संचालक, जे रोटेशनद्वारे सेवानिवृत्त होत आहेत आणि पात्र असल्याने स्वतः पुनर्नियुक्ती चा प्रस्ताव देत आहे, त्यांची कंपनीचे संचालक म्हणून पुनर्नियुक्ती केली जाईल, जे रोटेशन व्दारे निवृत्त होण्यास जबाबदार असतील. उपरोक्त कलमाचे पालन करून, ज्या भागधारकांचे शेअरहोल्डिंग रु. १०००/- पेक्षा जास्त आहे, त्यांना वार्षिक अहवालाची प्रत्यक्ष प्रत देण्यात येईल, इतर भागधारकांसाठी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात ती मिळवू शकेल. कंपनी सर्व भागधारकांना विनंती करते की ज्यांनी अद्याप कंपनीकडे त्यांचा ईमेल आयडी नोंदणीकृत/अपडेट केलेला नाही त्यांनाही सार्वजनिक सूचना प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसांच्या आत नोंदणी करावी.

सर्व सभासद / भागधारकांनी सभेला उपस्थित राहावे, ही विनंती. कंपनीच्या वार्षिक अहवालाची प्रत कंपनीच्या नोटिस बोर्ड वर सर्व लावण्यात आली आहे आणि कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात तपासणी केली जाऊ शकते, भागधारकांना वैयक्तिकरित्या किंवा प्रॉक्सी द्वारे मतदान करण्याचा अधिकार आहे.

सभासद / भागधारकांनी या प्रकरणातील कोणतीही शंका / तक्रारी madheshnidhi555@gmail.com ई-मेल आयडीवर पाठवावी.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
माढेश्वरी अर्बन मल्टीपल निधी लिमिटेड
अशोक लुणावत अध्यक्ष (DIN:८३१२५४० )

ठिकाण: बार्शी
तारीख: ०५ सप्टेंबर २०२४

**MADHESWARI URBAN MULTIPLE NIDHI LIMITED**

**Regd. off: 3470 Telgirnee Chowk Barshi Solapur MH 413411**

Email ID- madheshnidhi555@gmail.com CIN: U65990PN2018PLC180988

**NOTICE OF THE 6th ANNUAL GENERAL MEETING**

Notice is hereby given to all Shareholders in pursuant to Section 2 (20) and 91 of the Companies Act, 2013 and read with Companies Rules, 2014 and other applicable law the Company would be conducting AGM on Monday, 30th September, 2024 at 12.00 noon at 3470 Telgirnee Chowk Barshi Solapur 413411 on Physically with the transact the business as below:-

ORDINARY BUSINESS:

a) To receive, consider and adopt the Audited Financial Statements for the year ended 31st March 2024, together with the Director's Report and the Auditor's Report thereon.

b) To consider and if thought fit, to pass with or without modification, the following Resolution as an Ordinary Resolution:

"RESOLVED THAT Mr Ashok Dagadulal Lunawat [DIN: 08312540], Director, who retires by rotation and being eligible offers himself for reappointment, be and is hereby reappointed as the Director of the Company, liable to retire by rotation."

In Compliance with aforementioned section, Physical copy of Annual report is hand delivered to the Shareholders who shareholding is more than Rs. 1000/-, The members who do not receive Notice can get the same at the registered office of the Company. The Company requests all the shareholders who have not yet registered /updated their email id with Company to register the same within 3 days from publication of this public notice.

All the members/shareholders are requested to attend the Meeting. The Annual report of the Company can be inspected at the registered office of the company and financial statement with enclosures are affixed in the Notice Board of the Company and Shareholders are entitled to vote either in person or through proxy.

Any Query/grievances in this matter may be addressed at E-mail ID madheshnidhi555@gmail.com.

By order of the Board
For Madheswari Urban Multiple Nidhi Limited
Mr. Ashok Dagadulal Lunawat
Chairman (DIN: 08312540)

Place: Barshi
Date: 05/09/2024